RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४९] बुधवार, जून २४, २०२६/आषाढ ३, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ७४

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांजकडून

अधिसूचना

क्रमांक गृह/का.१/टे.४/विकाअ/वशी- ०१/२०२६.— जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा पालघर ह्या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पालघर जिल्ह्यातील पालघर नगरपरिषद पालघर सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये निवडून आलेल्या व नामनिर्देशित पालिका सदस्यांची खालील प्रमाणे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून ५ वर्षाकरीता अथवा पुढील आदेशांपर्यंत अथवा सदर व्यक्ती त्या पदावर असेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील. तसेच जिल्हाधिकारी पालघर यांना विशेष कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

(१) विशेष कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये :—

- विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरीकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.
- वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि भूकंपासारख्या आपत्तीमुळे होणारी जिवितहानी, कोणतीही आकस्मिक घटना जिच्यामुळे होणारी जिवित हानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात /नदीत वाहून गेलेले इत्यादीकरीता शोध व बचाव पथकास "आपदा मित्रास" तसेच स्थानिक पातळीवर महसूल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.
- ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य तसेच सण व उत्सवाच्या काळात अनूचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.
- शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.
- निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नावे, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागात देण्याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

- आपले सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्र / आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरिता नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.
- शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, कृषि, पशुसंवर्धन इ. विषयाबाबत नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.
- हुंडा, व्यसनाधीनता, बालमजुरी, बालविवाह, वेठबिगारी प्रथा संपविण्यासाठी शासनास सहकार्य करणे.
- महिला, मुले व वृद्धांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.
- प्रदूषण नियंत्रणासाठी व वाहतूकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.
- पोलिसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यांमध्ये पंच म्हणून काम करणे.
- समाजामध्ये एकोपा तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण राहावे याकरीता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.
- शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा, अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

(२) विशेष कार्यकारी अधिकारी यांचेसाठी अटी व शर्ती :—

१. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली कोणतीही पदसिद्ध नियुक्ती ५ वर्षाकरिता अथवा पुढील आदेशांपर्यंत अथवा सदर व्यक्ती त्या पदावर असेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील.

२. जिल्हाधिकारी यांना विशेष कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

३. नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्यांचेविरुद्ध गंभीर गुन्ह्याची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा नादार म्हणून जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय सुद्धा, कोणतीही पूर्वसूचना न देता अशी नियुक्ती, मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार शासनास / जिल्हाधिकारी यांस असतील.

४. उपोद्घातातील क्रमांक १ चे शासन निर्णयातील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या शासन निर्णयांचे / आदेशांचे पालन करण्यात यावे.

५. ज्या पदामुळे (नगरसेवक / जिल्हा परिषद सदस्य / पंचायत समिती सदस्य) यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदावर पदसिद्ध नियुक्ती करण्यात आली होती, ते पद संपुष्टात आल्यास, पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती आपोआप रद्द होईल.

६. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी त्यांच्या घरावर/दुकानावर/ कार्यालयावर स्वतःच्या नावासह " विशेष कार्यकारी अधिकारी " असा फलक लावावा. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर " विशेष कार्यकारी अधिकारी " असा उल्लेख करु नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

अनुसूची 'अ'

अ.क्र.	वर्ष	शासन निर्णयानुसार जिल्हा क्रमांक	आधारकार्ड नंबर	अ.क्र.	नगराध्यक्ष/ नगरसेवकांचे नाव	महानगरपालिका/ नगरपरिषद/नगर पंचायतीचे नाव
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
1	2026	36	549227709258	PNP/1	घरत उत्तम मोरेश्वर	पालघर
2	2026	36	904672696389	PNP/2	म्हात्रे प्रियंका राजेंद्र	पालघर
3	2026	36	415733985672	PNP/3	कलाडिया अरिफ उस्मान	पालघर
4	2026	36	447151151231	PNP/4	मिश्रा मोना मुन्ना	पालघर
5	2026	36	892751138349	PNP/5	धोत्रे भारती सुरज	पालघर
6	2026	36	459594538559	PNP/6	कोती महेश पांडुरंग	पालघर
7	2026	36	558228391838	PNP/7	मोरे कृपा प्रविण	पालघर

अ.क्र	वर्ष	शासन निर्णयानुसार जिल्हा क्रमांक	आधारकार्ड नंबर	अ.क्र.	नगराध्यक्ष/ नगरसेवकांचे नाव	महानगरपालिका/ नगरपरिषद/नगर पंचायतीचे नाव
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
8	2026	36	279693349815	PNP/8	राऊत आनंद जनार्दन	पालघर
9	2026	36	713808449752	PNP/9	मोरे प्रिती रमाकांत	पालघर
10	2026	36	846768065503	PNP/10	पाटील राजेंद्र आत्माराम	पालघर
11	2026	36	740302697377	PNP/11	जैन पुष्पा हिम्मतलाल	पालघर
12	2026	36	740484340760	PNP/12	म्हात्रे प्रगती विश्वनाथ	पालघर
13	2026	36	237066396010	PNP/13	खान रईस मोबीन	पालघर
14	2026	36	347361970351	PNP/14	जाधव ज्योती दिपक	पालघर
15	2026	36	408400954057	PNP/15	मेमन मुनाफ उस्मान	पालघर
16	2026	36	904937100565	PNP/16	मानकामे राधा अरविंद	पालघर
17	2026	36	927384372501	PNP/17	पाटील राहुल प्रकाश	पालघर
18	2026	36	708054997305	PNP/17	आघाव मेघा विनय	पालघर
19	2026	36	24838673165	PNP/19	पाटील अमोल प्रकाश	पालघर
20	2026	36	397258501184	PNP/20	चंपानेरकर विभूती विपुल	पालघर
21	2026	36	435724662633	PNP/21	संखे निलमकुमार मनोहर	पालघर
22	2026	36	991779936095	PNP/22	शिंदे सोनाली सागर	पालघर
23	2026	36	650708299644	PNP/23	संखे भावानंद शांताराम	पालघर
24	2026	36	787819098895	PNP/24	पिंपळे अमिष सुभाष	पालघर
25	2026	36	447670374505	PNP/25	डॉ.सौ.काळे उज्ज्वला केदार	पालघर
26	2026	36	394199004410	PNP/26	वडे चंद्रशेखर गोपीनाथ	पालघर
27	2026	36	810562843614	PNP/27	बाजपेई शिल्पा अमर	पालघर
28	2026	36	459187820012	PNP/28	घरत दिनेश शिवाजी	पालघर
29	2026	36	403960444511	PNP/29	माने गीतांजली हर्षल	पालघर
30	2026	36	207606115610	PNP/30	सापटे माधुरी मोहन	पालघर
31	2026	36	392551517864	PNP/31	घरत जश्विन मनोज	पालघर
32	2026	36	634488298183	PNP/32	ॲड धर्मेंद्र प्राणलाल भट्ट	पालघर
33	2026	36	403317895148	PNP/33	म्हात्रे रविंद्र मधुकर	पालघर
34	2026	36	991331310175	PNP/34	जयेश रघुनाथ आव्हाड	पालघर

पालघर,
दिनांक १५ जून २०२६.

डॉ. इंदु राणी जाखड़,
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.